# 1
# गंगास्थिति निर्णय

## (गंगामहात्म्यासिद्धी)



भगवती उमा ही माता, भगवान् शंकर हे पिता, श्री ज्ञानेश्वर महाराज हे गुरु, भगवान् श्रीकृष्ण हे पती व राधा इ. गोपिका या बहिणी. महाराज म्हणतात की अशा या पंचायतानास अंतःकरणात स्थापन करून, त्यांची पूजा करून मी आता गंगामातेचे दुग्धपान करण्यासाठी तिच्या चरणांशी मन केद्रित करतो. कोणी उच्च वर्णाचा असो वा खालच्या वर्णाचा असो, पुण्यवान्. असो किंवा पापी असो, गंगास्नानावाचून कुणालाच गति नाही (उद्धार होण्याचा उपाय नाही, हा माझा ठाम विश्वास आहे.

अवघ्या पापी लोकांची उद्धारकर्त्री फक्त गंगाच आहे. वेद, स्मृति, पुराणे, इतिहास या सर्वांचा अभिप्राय एकच आहे की धर्म देखील गंगेमुळे घडू शकतो. तरी पण जिवंतपणीच नरकात वावरणारे आणि पुराणातल्या काही विशिष्ट अंशालाचउराशी बाळगणारे अन् भल्याभल्यांचीही दिशाभूल करू पाहणारे असे काही संशयात्मा जीव अस्तित्त्वात आहेतच. ते वटवट करीत असतात की कलियुगात गंगा निघून जाणार, तिच्यातली पापक्षालनाची शक्ती नष्ट होणार.

त्यांच्या या वचनांचा खरेखोटेपणा पडताळण्यासाठी त्या वाचाळांना आमचा प्रश्न आहे, की - आपल्या बालकांना सोडून ही गंगा वैकुंठगमन करणार हे कशावरून? हे वेदवचन आहे की स्मृति-पुराणात प्रतिपादन केले आहे? की तर्कानी अथवा अनुभवाने सिद्ध आहे?

४

यातील पहिली गोष्ट (वेदवचन) शक्यच नाही, कारण तिचे भूलोकातील अस्तित्व प्रत्यक्ष श्रुतींनीच सांगितले आहे, आणि ते सर्वांनाच मान्य आहे. येथे अशीही शंका घेणे योग्य नाही की ते स्वर्गातील गंगेचे वर्णन असेल, कारण गंगेसमवेतच प्रयागाचेही माहात्म्य वेदात वर्णिलेले आहे ते पहावे.–

वेदमंत्रार्थ - जेथे गंगा, यमुना व पूर्ववाहिनी सरस्वती आहेत, जेथे भगवान सोमेश्वर आहे, तेथे (ऋग्वेद, अष्टक ७, अ.५ वर्ग२८.परिशिष्ट)

किंवा ''जेथे (गंगेचा) शुभ्र व (यमुनेचा) काळा प्रवाह एकत्रित होतो, तेथे स्नान करणाऱ्यांना स्वर्गप्राप्ती होते. जे धैर्यशील लोक तेथे देहत्याग करतात, ते अमृतत्वास प्राप्त होतात. (ऋग्वेद, अष्टक ८ अध्याय ३ परिशिष्ट)

''या प्रयागक्षेत्री मृत्यू पावलेल्यांना स्वर्ग मिळतो हे वेदवचन आगदी स्पष्ट आहे आणि स्वर्गात काही भेद आहे (तो स्वर्ग वेगळा व हा स्वर्ग वेगळा) अशी तर कल्पनाही करणे शक्य नाही, कारण ययातिराजादिकांचीही तशी मनोधारणा दिसून येत नाही.

पूर्वपक्ष- स्वर्गारोहणपर्वातील तृतीय अध्यायात वर्णन आहे की,'हे युधिष्ठिरा, त्रिभुवनाला पवित्र करणारी ही पावन देवनदी आकाशगंगा आहे. येथे स्नान करून पुढे जा. येथे स्नान केल्यानंतर तुझा मनुष्यस्वाभाव लुप्त होऊन, तुला शोक, कष्ट व वैरभाव यांपासून मुक्ति मिळेल.''

त्यावरील टीका आहे की, येथे मनुष्यांना शिरकाव नाही, म्हणूनच हिला 'देव' नदी म्हटले आहे. ही भूमीवर नाही, म्हणून ''आकाशगंगा'' म्हटले आहे. (येथे स्नान केल्यास) दैवी शरीर प्राप्त होईल, असे येथे अभिप्रेत आहे.''

येथे स्वर्गाराहेण पर्वातील ''स्वर्गगंगेच्या स्नानाने मानवी शरीर त्यागून तू दैवी शरीर धारण करशील'' या वाक्याद्वारे ''सितासिते सरिते यत्र'' या वेदातील वाक्याचे उपबृंहण करावयास हवे, कारण स्मार्त विधिनुसार,''

६

''इतिहास व पुराणांच्या आधारे वेदाचे उपबृंहण करावे. अल्पश्रुत माणसााची प्रत्यक्ष वेदालाही भीती वाटत असते, की हा माणूस (अर्थाचा विपर्यास करून) माझ्यावर प्रहार तर नाही ना करणार?

शिवाय, शंकराचार्यांनीच छान्दोग्य उपनिषदाचे भाष्य लिहिताना सातव्या अध्यायाच्या प्रथम खंडात, पांचवा वेद म्हणून महाभारत हया ग्रंथाला मान्यता दिलेली आहे. म्हणून, वेद नसलेल्या महाभारताद्वारे वेदाचे उपबृहंण कसे करावे ही शंका निराधार ठरते. म्हणून, भूलोकावर गंगेची स्थिती (अस्तित्व) नाही.

उत्तरपक्ष- हे विधान पूर्वपक्षाच्या भ्रमाचे द्योतक आहे. तेथे (महाभारतांत) स्वर्गारोहणप्रसंगी 'प्रयाग' व 'यमुना' यांचा उल्लेख नाही, परंतु वेदांत मात्र सरस्वती व यमुना यांच्याशी गंगेचा संगम असल्याचे दर्शविलेले आहे, परंतु तसे स्वर्गात कुठेही असल्याचे वर्णन आढळत नाही. उपनिषदांतही, गंगेसह काशीचे महात्म्य गायिलेले आहे. म्हणून, वेदवाक्यानुसार हाचनिर्णय होतो की गंगेचे अस्तित्व भूलोकावर आहे.

इतिहासानुसार जरी ''भगीरथाने गंगा (पृथ्वीवर) आणली असे असले, तरी भूलोकावर गंगा अनादिकालापासून होती हे निश्चित आहे, कारण वेद काही भगीरथाच्या नंतरचे नव्हते त्यांचे अनादित्व सर्वमान्य आहे.

कर्मकाण्डालाच सर्वोपरि मानून, ईश्वराचा अधिक्षेप करणाऱ्या मीमांसकांनी देखील गंगेच्या (पृथ्वीवरील) अस्तित्वचा विरोध केलेला नाही. याप्रमाणे गंगेच्या अस्तित्वाचे प्रमाण वेदांत प्रत्यक्ष दिसते, परंतु गंगेच्या प्रस्थानाचा मात्र श्रुतींत कोठेही उल्लेख नाही. स्मृति आणि पुराणांत जरी गंगेच्या गमनाचा उल्लेख करायला हवी. स्मृति-पुराणातल्या वाक्यांचा आधार घेऊन वेदवचनांना बाध आणणे उचित नाही. उपबृंहणही करावयाचे, ते श्रुतीच्या अर्थाला बळकट करण्यासाठी, श्रुतींना बाध आणण्यासाठी नव्हे. नाही तर मग गायत्रीमंत्रापेक्षा पिशाचमंत्रच अधिक प्रमाणभूत मानावे लागतील. आणि ज्ञानापेक्षा उपासनाच बलवत्तर ठरेल. वेदांत जे थोडक्यात सांगितलेले असते, त्याचीच पुराणांत विस्तृत विवेचन करणे म्हणजे उपबृंहण होय.

पूर्वपक्ष- मत्स्यपुराणांतच उल्लेख आहे की ब्रहमाच्या मुखांतून वेदांच्याही अगोदर पुराणांची उत्पत्ति झाली- पहा,

सर्वशास्त्रा आधी ब्रह्देवाचे पुराणांचे स्मरण केले. ते पुराण नित्य, शब्दमय, पवित्र व शतकोटी (श्लोकां) इतकेंविस्तृत होते. त्यानंतरच त्याच्या मुखांतून वेद बाहेर पडले (मत्स्य-३७)

शिवाय, छांदोग्य (७/१/२) व बृहदारण्यक (२/४/१०) या उपनिषदांत, वेदासोबतच पुराणांनाही 'विद्या' म्हटले आहे. भाष्यकार शंकाराचार्यांनीही (पंचम वेद म्हणून) महाभारताचा गौरव केलेला असल्यामुळे, पुराणे तेव्हांही सर्वमान्यच होती.

उत्तरपक्ष- हे जरी खरे असले, तरी त्यामुळे पुराणे वेदाइतकींच प्रमाण मानावीत इतकेच सिद्ध होते. परंतु श्रुतींना बाध आणण्याचे सामर्थ्य मात्र त्यांचे (स्मृति-पुराणांचे) नाही.

अशा प्रकारे, श्रुतीच्या आधारे गंगामाऊलीची स्थिती निश्चित झाली श्रुतींना अनुकूल असा (स्मृतिवचनांचा समन्वयही आम्ही दाखविला. आता पुढल्या अध्यायात पुराणवाक्यांची संगति करून दाखवू.

## द्वितीय कवल पुराण वाक्य समन्वय

---

आता पुराणवचनांची संगति लावू या. पुराणांतील विशिष्ट अंशालाच उराशी कवटाळणारे लोग जी उदाहरणे देतात, तीच आधी घेऊ या.

सनत्कुमार - संहितेतील वचन आहेत की, गंगा कलियुगात ५००० वर्षेपर्यंत राहील, नंतर निघून जाईल. शिवाय ब्रह्मवैवर्त पुराणांतही उल्लेख आहे की ''भगवान वैकुंठास जाण्यास निघाले असता गंगेने विचारले की, 'देवा, आता माझे भवितव्य काय? तेव्हा

१०

भगवंताने उत्तर दिले की, '' कलियुगातील ५००० वर्षापर्यंत तू भूलोकावर रहा. (ब्र. वे., अध्याय १२९ कृष्णजन्मखण्ड, श्लोक ५१) ५००० वर्षानंतर तू पुन्हा (वैकुंठास) येईल, असेही वचन आहे. सरस्वतीच्या शापामुळे ५००० वर्षे भूलोकी राहून गंगा परत वैकुंठास गेली'' असेही म्हटले आहे.

''कलियुगांत ५००० वर्षे भारतात राहून, मग नदीचे रूप त्यागून ती परत विष्णुपदास (वैकुंठास) गेली'' असेंही वचन आहे. (ब्रह्मवैवर्त, अध्याय ७, श्लोक ४०)

उत्तरपक्ष - ही उपर्युत उदाहरणे पूर्वपक्षाकडून प्रस्तुत केली. जातात. इथे आमचा एक प्रश्न आहे, की हया वचनांच्या विरोधी वचने पुराणांत नाहीत की काय? मत्स्यपुराणात प्रयाग महात्म्यात म्हटले आहे, की ''प्रलयकाळीं अवघ्या सृष्टीचा रुद्र संहार करील, परंतु प्रयागतीर्थ कदापि नष्ट होणार नाही.'' तेव्हा सृष्टिप्रलय झाला तरीही प्रयागक्षेत्र अबाधितच राहणार.

तसेच स्कंदपुराणात काशीखंडात वचन आहे की प्रलयाच्या वेळी प्रत्यक्ष महादेव काशीक्षेत्रास गंगेसह आपल्या त्रिशूलावर धारण करून वाचवितात.

शिवाय, भगिरथास वर देताना गंगेने स्पष्ट म्हटले आहे की, ''जोवर सूर्य-चंद्रांचे अस्तित्व आहे, तोवर माझ्या पवित्र प्रवाहाच्या बळावर तुझी कीर्ती अमर राहील.''

योगवासिष्ठांतही म्हटले आहे की महात्मा भगीरथाने जी गंगा आणली, ती 'नित्य' आहे. महाभारतातही उल्लेख आहेकी आई की आई जशी मुलांचा प्रतिपाळ करते, तशी ही पापनाशिनी गंगाही नेहमीच करत असते. कूर्मपुराणातही म्हटले आहे,

कृतयुगांत नैमिषक्षेत्राचे माहात्म्य आहे, त्रेतायुगात पुष्करतीर्थाचे, द्वापरयुगांत कुरुक्षेत्रांचे, व कलियुगात गंगेचे। तसेच, कृतयुगात सर्वच तीर्थे फलदायक होती, त्रेतायुगांत पुष्करतीर्थ, द्वापारयुगात कुरुक्षेत्र आणि कलियुगात मात्र फक्त गंगाच फलदायिनी आहे.''

१२

बाकींची सर्व तीर्थें आपापल्या सामर्थ्याचा गंगेत विलय करून (तिच्याद्वारे) लोकोद्धार करतात, परंतु गंगा मात्र स्वतःच्याच बळाने लोकांना उद्धरते. तिने स्वतःचे सामर्थ्य कुठे अन्य ठिकाणी ठेवल्याचा उल्लेख कोठेही नाही.

सिंहस्थपर्वाच्या वेळी गोदावरी आदि नद्यांना जे महत्त्व मिळते, तेही गंगेच्याच जोरावर, स्वतंत्र रीतीने नव्हे, कारण लोकांची अशी धारणा आहे की काशीची गंगा तेथे येत असते.

तुकारामादि संतांनी काशीपेक्षाही पंढरीची अधिक महती गायिली आहे खरी, पण ती तातकूपन्यायाने (वडिलांनी बांधलेली विहीर जशी आपुलकीच्या भावनेमुळे, इतर विहिरीपेक्षा अधिक जवळची, आपली प्रिय वाटते तसा हा प्रकार अहे ) ही श्रद्धा शास्त्रीय नव्हे, तर सात्विकी श्रद्धा आहे.

काशीखंडात म्हटले आहे की काशीची थोरवी गंगेच्या आगमनामुळेच बळावली आहे. पूर्वी काशीत मणिकर्णिका क्षेत्र होते खरे, परंतु गंगेचे महात्म्य त्याच्यापेक्षा दसपटीने जास्त आहे. घोर कलियुगात लोकांना तारणारी कुणी क्षेत्रे असतील तर ती हरिद्वार, प्रयाग, वाराणसी, कुरुक्षेत्र आणि हिमालय हीच. गंगा तर सर्वच ठिकाणी आणि नेहमीच उद्धरणारी आहे. वर सांगितलेली पांचही क्षेत्रे गंगेमुळेंच उद्धारकारी म्हणून प्रसिद्ध आहेत.

आता या साऱ्या वचनातील अंतर्विरोध दूर करावयास हवा. तो अशाने होईल-गंगेच्या वैकुंठगमानाविषयींची जीवचने आहेत तीं पूर्वीच्या कल्पात घडलेल्या घटनेबाबत समजावीत. वास्तविक पाहता वर किंवा शापाची घटना एकमेकांशी

बोलल्यावाचून शय नाही. हे देवतांनाच संभवनीय आहे. जसे शंतनूची पत्नी गंगा होती, ती जलरूपी नसून देवतारूपीहोती, तद्वतच शापदेखील देवतरूपासच लागू पडतो. तेव्हा त्यांतील संगती अशी की गंगेचा शाप जेव्हा नष्ट होईल, तेव्हाच वैकुंठगमनास तिला आडकाठी राहणार नाही. ही केवळ एक लीलामात्र समजावी.

१४

पृथ्वीतलावर गंगेचे अस्तित्व अनादिकालापासून असल्याबद्दल वेदांचेच प्रमाण असल्यामुळे, गंगेला भगीरथाने आणले या गोष्टीस असे समजावें की, शंखासुराने पळवून नेलेले वेद जसे मत्स्यावतार धारण करून भगवंताने आणले, किंवाएकादशीचे महात्म्य जसे रुमागंद राजानें प्रकट केले, तशीच ही देखील घटना आहे. (वेद व एकादशी यांचे अस्तित्व अनादिकालापासून होतेच, परंतु त्यांच्या पुनःप्रकटनास मत्स्यावतार आणि रुक्मागंद कारणीभूत झाले, त्याप्रमाणे गंगा अनादिकालापासून अस्तित्वात आहे, परंतु भगीरथामुळे ती पुन्हा भूतलावर अवतीर्ण झाली. हा गर्भितार्थ,)

तृतीय कवल युक्तीने समन्वय

---

आता तर्कशास्त्राच्या कवलास प्रारंभ करू.

पूर्वपक्ष : हे जे गंगेचे माहात्म्य गायिले जाते ते देवतारूपी गंगेचे की जलरूपी गंगेचे ? जर देवतेचे असेल, तरशाप वगैरे प्रसंगी, शाप देणाऱ्याचा प्रतिपक्ष गंगेकडे येतो, म्हाणजे गंगेचे वैकुंठात जाणे. खरे मानावे लागून, तिचे सामर्थ्य नष्ट होईल असेच ठरते जलरूपी गंगेचे म्हणत असाल, तर पाण प्रतयक्षात दिसते परंतु त्या पाण्याच्या ठिकाणी काही खास सामर्थ्य दिसत नाही. आणि वैकुंठ किंवा वैकुंठस्वामी विष्णु इत्यादिकांचे ज्ञान प्रत्यक्ष डोळयानी कांही होत नाही, कारणते दृष्टीआड (परोक्ष) आहेत.

उत्तरपक्ष - ज्या पदार्थाची जी देवता असेल, तिची दोन रूपेअसतात, एक त्या वस्तूचे (डोळयांना दिसणारे) रूप व दुसेर तिचे खरे (अलौकिक) रूप ज्याप्रमाणे सूर्यनारायणाचे एक रूप तेजोगोल म्हणून व दुसरे रथात बसलेल्या वेदत्रयमूर्तीचें, त्याचप्रमाणे गेचीही दोन रूपे आहेत. एक जलरूपी व दुसरे गोलोकात वसणारे दिव्य रूप.

बोलणे वगैरे क्रिया दुसऱ्या रूपातच संभवू शकतात. सूर्यनारायणही आपल्या पहिल्या (तेजोगोल) रूपाद्वारे त्रिभुवनास प्रकाशित करतात व भक्तांना साक्षात्कार मात्र दुसऱ्या रूपाने देतात. त्याप्रमाणे गंगादेवीही पहिल्या (जलमय) रूपाने पापक्षालन करून, दुसऱ्या रूपाने भक्तांवर अनुग्रह करते व आपापल्या लोकात व्यवहारही करीत असते.

पूर्वपक्ष - शरीर तर पार्थिव (पृथ्वीतत्वाचे आधिय असणारे) असते, मग जलमय शरीर कसे शक्य आहे?

उत्तरपक्ष - हे म्हणणे योग्य नाही. नैयायिकांच्या मते शरीर जलरूपपीही असूं शकतें, परंतु मनुष्यदेहाप्रमाणे त्यांच्या ठिकाणी सत्त्वगुणाचे प्राबल्य असल्यामुळे, त्यांचा व्यवहार माणसांप्रमाणे ठराविक जागी असलेल्या अवयवांद्वारेच होतोअसे नाही. इंद्रिये भौतिक (पंचमहाभूतांनी घडलेली) असोत या प्राकृत (प्रकृतिजन्य) असोत, सत्त्वगुणाच्या वैशिष्टयामुळे त्यांचा व्यवहार कधीही व कुठेही होऊ शकतो, कारण इंद्रियांना बंधनस्वरूप असणाऱ्या तमोगुणाचा (त्या दैवी शरीरात) अभाव असतो.

देवांच्या देहाचे जे मानवदेहाप्रमाणे वर्णन केलेले आढळते, ते ह्याच भावनेने की त्या त्या उपासनेत साधकाने तसेतसे ध्यान करावे. तसे नसते, तर चतुर्मुख (ब्रह्मा), पंचमुख (शंभु), चतुर्भुज (विष्णु) यांनाही आयर्थार्थ म्हणावे लागेल. म्हणून जलानें आच्छादित अशा देवताशराराद्वारेंच गंगादेवी आपल्याला पावन करते.

पूर्वपक्ष - सर्प जसा कात टाकून देतो, तद्वत् गंगाही जलमय शरीर टाकून वैकुंठगमन करते असे जर मानले, तर(येथे उरलेल्या जलप्रवाहात) काहीच सामर्थ्य उरत नाही असे म्हणावे लागेल.

उत्तरपक्ष - तसे नाही, कारण जलही तिचेच रूप आहे. त्या जलरूपाचे माहात्म्यही वर्णिलेले आहे-पहा

१) तत्राप्लुतासो हे श्रौत वचन.

२) ''तुझ्या तीरवरील वानीरवृक्षावरून वाहणाऱ्या वाऱ्यामुळे उडलेल्या धुळीच्या एका कणाच्या स्पर्शानेच माझी पापे क्षीण झाली.

३) ''वाऱ्याने उडून आलेल्या तुझ्या पावन जलाच्या एका तुषाराद्वारे नरकयातना निघून जातात.''

४) ''त्या जलावरून वाहणारा नुसता वायूदेखील पवित्र करतो.''

ह्या सर्व स्मृतिवचनांवरून, आणि आचार्य आणि कवि इ. नी सुद्धा जलाचेच माहात्म्य वर्णिलेले असल्यामुळे आमचाच अर्थ बरोबर आहे. सापाच्या कातेप्रमाणे आपली उपाधि गंगा त्यागते ह्या गोष्टीला प्रत्यक्ष आणि अनुमान यांचा काहीच अधार नसल्यामुळे शब्दप्रमाण मानल्यावाचून गतीच उतर नाही, आणि शब्दप्रमाणा नुसार आमच्रा म्हणण्यास काहीच विरोध नाही. शिवाय मागील दोन कवलात हें सिद्ध करून दाखवलेलेंच आहे, म्हणून पूर्वपक्षाचे म्हणणे आपोआपच निरस्त झाले आहे.

भागवताला जसे श्रीकृष्णाचे 'वाड्.मय' स्वरूप (वाड्.मयीन मूर्ती) मानतात, त्याप्रमाणे गंगेचे जलस्वरूप मानावे, परंतुते शरीर भौतिक आहे अशी मात्र शंकाही घेऊ नये, कारण त्या जलाच्याही ठिकाणी दैवी सामर्थ्यास बाधा येत नाही. शंकराचार्यांनी जे ''गंगाजललव कणिका पीता'' अशी वाणीची कामधेनूप्रमाणे धारा वाहवली, ती याच अभिप्रायाने.

पूर्वपक्ष - गंगेच्या तीरावर (शवदाहादि) बीभत्स क्रिया होत असल्यामुळे व शृंगारादि क्रियांचे वर्णन कवींनी तिच्याबद्दल केल्यामुळे गंगेचे वस्तुतंत्रत्व नष्ठ होत नाही काय?

उत्तरपक्ष - नाही. ऋतुकालीन कामिनीच्या अंगावर अलंकार नसणेच भूषणावह ठरते. तसाच ह्याही विरोधाभास समजावा. (उलट, गंगेच्या पावनी प्रवृत्तीमुळे तीरावरील बीभत्स कृत्यांचें बीभत्सव देखील नाश पावते असाही अर्थ निघू शकतो)

अनुमान हे वस्तुतंत्र असल्यामुळे, परोक्ष ज्ञान हे सर्वस्वी कर्तृतंत्र राहू शकत नाही, आणि देशाचे नुसते नाव ऐकून त्या देशाचे कर्तृतंत्र संभवत नाही.

उपासनेमध्ये काही वेळा, श्रद्धा ही कर्तृतंत्र असल्यामुळे धर्माची अपेक्षा नसतानाही, शिळपिल्लादि प्रसंगी लाभ झालेला दिसून येतो तोही, त्या वस्तूच्या ठायी असलेल्या ईश्वराबद्दलच्या भावामुळे अर्थात् वस्तुतंत्रावरच तो आधारित असतो.

(दक्षिण भारतातील एका कथेनुसार, एका साधूने काही बालिकांना छोटेछोटे खडे देऊन हेच शालिग्राम आहेत असे सांगितले. त्या मुलींनी हार्दिक श्रद्धेनें ''शिलपिल्ल शिलपिल्ल'' (शालिग्राम) असा जप करत त्यांची पूजा केली व त्यांना साक्षात्कार झाला)

परंतु मूढ लोकांच्या बाबतीत मात्र ही श्रद्धा नसल्यामुळे तेथे कर्मकांडाचेच स्तोम असते (त्यांना त्या मूर्तीत ईश्वरसाक्षात्कार घडू शकत नाही, पण हा दोष त्यांचा स्वतःच्या मूढत्वाचा होय. मूर्तीचे वस्तुतंत्रत्व त्यामुळे कमी नाही.)

पूर्वपक्ष - असेल, पण वस्तुतंत्र देवतेतच असू शकते, जलप्रवाहात नाही.

उत्तरपक्ष - तसेही नाही कर्तृतंत्र वस्तूचे ज्ञान दृढ होण्यासाठी त्याची वारंवार आवृति करावी लागते, पण येथे (गंगेच्या बाबतीत) तसे नाही. मनाची धारणा एकच वेळा जरी केली, तरी कार्यसिद्धि होते, कारण तिच्या ठायीं तसेच लोकोत्तर गुण आहेत - पहा-

येथे ''सौभाग्य'' त्या शब्दाद्वारे मांगल्यदायित्व सूचित केले आहे व ''महैश्वर्य शब्दाने सर्वसामर्थ्य. महेश्वरापासून जन्म झाल्यामुळे वेदांप्रमाणेच तीही ईश्वरजनित आहे हेही दर्शविले आहे. श्रृतींनीं सर्वस्व '' म्हटले आहे. ''सुमनसां (देवांना) मूर्त

सुकृतं'' या शब्दांद्वारे ध्वनित केले आहे की, ती फक्त जीवांच्याच पुण्याद्वारे निर्मित नाही, कारण जीवांचेपुण्य साकार रूपात कोठेही आढळत नाही. म्हणून, ईश्वराच्या सत्यसंकल्पत्वामुळें, फक्त त्याचेच पुण्य मूर्तरूपात दिसू शकते, तीच ही गंगा । 'सुमनसा' हे बहुवचन येथें बहुमानार्थी आहे.

'सुधासौंदर्य' या शब्दांतील 'सुधा' याचा अर्थ आहे सुष्ठु (चांगल्या रीतीने) धारण किंवा 'सुधा' म्हणजे अमृत असा अर्थ घेतल्यास, अमृताचे सौदर्य (सहोदराप्रमाणे, सख्या भावाप्रमाणे असणे) ज्यात आहे असा जलप्रवाह, म्हणजेच ''अमरत्व देणारा'' असा अर्थ निघतो - म्हणजे अमृतत्व देणे हा गुण तर आहेच, शिवाय जलस्वरूपी असल्यामुळे अमंगलाला धुवूनकाढणे हा एक जास्तीचा सद्‌गुण तिच्या ठायी आहे.

अशा प्रकारे गंगेचे गुण दर्शविल्यानंतर आता वस्तुतंत्रत्व दाखवले आहे -

ही गंगा अत्यंत पुण्यमय आहे, म्हणून भक्तांच्या प्रारब्धकर्मा चाही नाश करते व दरिद्रतेमुळे येणाऱ्या लाचारीला दूर करते. ज्यांची ह्रदये दुष्ट वासनांनी भरलेली आहेत, अशांच्याही दुरिताला नष्ट करते, असे म्हणून, मुळाचे अपराधठाऊक असूनही त्याच्यावर क्षमादृष्टी ठेवणाऱ्या मातेप्रमाणे, ज्यांचीं पापे माहीत आहेत अशांनाही सहज प्रायश्चित देऊन ती उद्धार करते, असे सूचित केले आहे. ''द्रुत'' ह्या पदाद्वारे उत्कटतेची पराकाष्ठा दाखविली आहे. तरीही, तिच्या ठिकाणी मन केंद्रित होण्यासाठी अभ्यासाची, आवृत्तीची काहीही आवश्यकता नाही. हे सांगण्यासाठी ''प्रवाहस्ते बारां सकृदपि गतो वृष्टिसरणिम् '' ही पदावली योजिली आहे. (गंगालहरी)

पूर्वपक्ष - परंतु हे सव्र उपासनेच्या कक्षेत येते, म्हणून यामुळे श्रद्धाजाडय (बळेच श्रद्धा जडवून घेणे) हा दोष आहेच्र

उत्तरपक्ष - तसेही नाही. ''द्रागाविद्या द्रुनदलनदीक्षागुरू-'' ह्या पदाने हेच सूचित होते की अज्ञानरूपी वृक्षास समूळ उपठण्यासाठीच हा गंगाप्रवाह सदैव तत्पर आहे. म्हणून, ''अहं ब्रह्मास्मि'' या दिव्य स्फूर्तीचा लाभ भक्ताला देण्यासतो समर्थ आहे. (म्हणजेच, ही श्रद्धा अज्ञानजन्य नसून, 'अहं ब्रह्मास्मि' या दिव्य साक्षात्कारातून स्फुरलेली आहे. अर्थात्, श्रद्धाजाडयाचा प्रश्नच उद्‌भवत नाही)

अशातऱ्हेनें गंगामाउलीच्या अमृताचे (जलाचे) वस्तुतंत्रात्मक ऐश्वय्र सिद्ध झाले. या अगोदरच्या श्लोकांतील 'सकल वसुधाया' या वर्णनामुळे व तिच्या जलाचे प्रत्यक्ष दर्शन सहज घ्ड्ढणण्याजोगे असल्यामुळे, ''समृद्ध'' या पूर्वश्लोकांतील शब्दाच्या जोरामुळे, व तिच्या नित्यत्वामुळे ''गंगा वैकुंठास प्रस्थान करील'' या विधानाचे आपोआपच खण्डन साधले आहे. म्हणून ब्रह्मनिष्ठ अशा महात्म्यांनीदेखील, गंगामाऊलीचे दुग्धपान करण्यासाठी (जलप्राशनासाठी) गंगेच्या महतीचा आश्रय घ्यावा.

समाप्त